# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 12/06/2023 (सोमवार) दुपार

---

**पो.स्टे. सावनेर हद्दीमधील मौजा खुमारी शिवार येथील जुगार अड्डयावर धाड**
**—: स्थानिक गुन्हे शाखा नागपुर ग्रामीण ची कारवाई :—**

दिनांक ११/०६/२०२३ रोजी स्थानिक गुन्हे शाखा, नागपूर ग्रामीण येथील पथक सावनेर उपविभागात अवैध धंद्यावर रेड संबंधाने पेट्रोलिंग करीत असतांना पोलीस स्टेशन सावनेर हद्दीत मौजा खुमारी शिवार येथे गोपनिय बातमीदारांकडुन खात्रीशीर बातमी मिळाली की, मौजा खुमारी शिवारातील नटरंग फॉर्म हाउसचे एका खोलीमध्ये काही इसम ५२ तासपत्त्यावर पैशाची बाजी लावुन हारजीतचा जुगार खेळत असल्याची गोपनिय माहीती स्थानिक गुन्हे शाखेचे पथक यांना प्राप्त झाले वरून सदर पथकाने मौजा खुमारी शिवार येथे सापळा रचुन छापा टाकुन **आरोपी क्र. १) राजेश नंदलाल गौर, वय ३५ वर्ष, रा. माना मंदीर जवळ, टेका नाका कामठी रोड नागपूर २) रूपेश यशवंत नंदनवार, वय ४४ वर्ष, रा. दिलीप आटा चक्की जवळ नाईकवाडी बांग्लादेश नागपूर ३) श्रावण एकनाथ पराते, वय ४५ वर्ष, रा. लालगंज नाईकवाडी कळमना मार्केट नागपूर ४) नितीन परसरामजी चंदनखेडे, वय ३४ वर्ष, रा. ५६ गल्ली नं. ०५, शक्तीमाता नगर, नंदनवन नागपूर ५) विलास रामभाऊ पौनिकर, वय ४८ वर्ष, रा. शिवाजी पार्क वाठोडा नागपूर ६) निखील नारायण अग्रवाल, वय ३० वर्ष, रा. ए.बी.सी अपार्टमेंट टेलिफोन एक्सचेंज चौक सि.ए रोड नागपूर ७) विपीन अशोक भानसे, वय ३० वर्ष, रा. जुनी मंगळवारी सि. ए. रोड नागपूर ८) विनोद श्रीधर मुळे, वय ५३ वर्ष, रा. हनुमान मंदीर जवळ शेष नगर मानेवाडा नागपूर ९) बबन वामनराव बुचे, वय ४२ वर्ष, रा. पोलीस स्टेशन पाचपावली समोर तांडापेठ नागपूर १०) ज्ञानेश्वर वसंता पराते, वय ४२ वर्ष, रा. लालगंज नाईकवाडी नागपूर ११) श्रीधर रामाजी तथकडे, वय ५० वर्ष, रा. भावना हार्डवेअर समोर जुनी मंगळवारी सि. ए रोड नागपूर १२) गजानन मोरेश्वर गेचोडे, वय ३५ वर्ष, रा. हनुमान मंदीर जवळ रमना मारोती नगर, नंदनवन नागपूर १३) अमोल हिरालाल गोतमारे, वय ३५ वर्ष, रा. साईबाबा नगर, खरबी नागपूर १४) संजय तामसिंग उमरे, वय ५० वर्ष, रा. माताघरे मोहल्ला जुनी मंगळवारी लकडगंज नागपूर** हे तासपत्त्यावर पैशाची बाजी लावुन जुगार खेळतांनी मिळुन आले. एकुण १४ जुगारी इसम यांना ताब्यात घेवुन त्यांचे ताब्यातुन एकुण नगदी २,९७,२८०/— रू., १४ मोबाईल किंमती १,४९,०००/—रू तसेच चारचाकी वाहन किंमती ३२,००,०००/—रू. व ५२ खुले तासपत्ते व तीन तासपत्ते पॅकेट किंमती २००/— रू. असा एकुण ३६,४६,४८०/— रुपयाचा मुद्देमाल जप्त करून आरोपीतांविरूध्द पोलीस ठाणे सावनेर येथे कलम ४, ५ महाराष्ट्र जुगार अधिनियम अन्वये गुन्हा नोंदवुन आरोपीतांना जप्त मुद्देमालासह पुढील कायदेशीर कार्यवाही करीता पोलीस ठाणे सावनेर यांचे ताब्यात देण्यात आले आहे.

सदरची कार्यवाही ही मा. पोलीस अधिक्षक श्री. विशाल आनंद, अपर पोलीस अधिक्षक श्री. डॉ. संदिप पखाले यांच्या मार्गदर्शनाखाली उपविभागीय पोलीस अधिकारी सावनेर विभाग सावनेर श्री. बापु रोहम, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. ओमप्रकाश कोकाटे, पोलीस उपनिरीक्षक आशिष मोरखडे, पोलीस हवालदार मयुर ढेकळे, पोलीस नायक सत्यशील कोठारे, अमृत किंनगे, रोहन डाखोरे यांनी यशस्वीरीत्या पार पाडली.

## रेती चोरी करणाऱ्या आरोपीतांविरूद्ध गुन्हा नोंद

**पो.स्टे. मौदा :—** अंतर्गत ०३ कि.मी. अंतरावरील मौजा माथनी टी पाईट येथे दिनांक ११/०६/२०२३ चे ०३.३० वा. ते ०४.१० वा. दरम्यान पोलीस स्टेशन मौदा येथील स्टाफ यांना गुप्त बातमीदारांद्वारे खबर मिळाली की, एक इसम ट्रकव्दारे अवैधरीत्या विनापरवाना रेतीची चोरटी वाहतुक करीत आहे. अशा मिळालेल्या माहिती वरून नमुद घटनास्थळी जावुन पोलीस स्टेशन मौदा येथील स्टाफ यांनी नाकाबंदी केली असता माथनी धाबा एन एच.— ५३ रोड भंडारा ते नागपूर दिशेकडे एक पिवळया रंगाचा ट्रक क्र. एम.एच—४०/वाय—१५०० जातांना दिसला ट्रक चालकास थांबवून ट्रकची पाहणी केली असता ट्रकमध्ये अंदाजे ४ ब्रास रेती भरुन दिसून आली. सदर रेती बाबत वाहन चालकास परवाना विचारला असता त्याने आपले नाव किष्णा आकरे, वय २६ वर्ष, रा. नेरी त्याचे ताब्यातून पिवळया ट्रक क्र. एम.एच. —४०/वाय—१५०० किंमती अंदाजे १८,००,०००/—रु व अंदाजे ४ ब्रास रेती किंमती अंदाजे २०,०००/— रु. असा एकुण १८,२०,०००/— रुपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

तसेच मौजा सोनेगाव राजा गुमथळा रोड कामठी येथे निळया रंगाचा सोनालीका ट्रॅक्टर विना परवाना नंबरचा ज्याचा इंजिन क्र. 3105ELV93J880780F20 चेचिस क्र. KZUSS885103S30 हिरव्या रंगाची ट्रॉली विना परवाना नंबरचा चालक **आरोपी नामे— 1) महेन्द्र आंनदराव ढोले, रा. सोनेगाव राजा** हा आपल्या ताब्यातील वाहनामध्ये विना परवाना अंदाजे २ ब्रॉस रेती किंमती ४०००/—रु व ट्रॅक्टर ट्रॉली किंमती अंदाजे ३,००,०००/—रु असा एकूण ३,०४,०००/—रुपयाचा मुद्देमाल नाकाबंदी दरम्यान चोरुन वाहतूक करतांना मिळून आल्याने मौदा पोलीसांनी जप्त केला आहे.

सदर प्रकरणी पो.स्टे. मौदा येथे आरोपीतांविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. गुन्हयाचा पुढील तपास सफौ. देशमूख ब. नं. ४५ मो. क्र ९९२२४४७०४५ हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**